RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष १, अंक ४१] गुरुवार, एप्रिल ३०, २०१५/वैशाख १०, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ८७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० एप्रिल २०१५.

### अधिसूचना

क्रमांक रेशीम १३२०००/प्र. क्र. ४/रेशीम कक्ष.—रेशीम संचालनालयातील गट-अ व गट ब मधील राजपत्रित पदांचे सेवाप्रवेश नियम शासन अधिसूचना क्र. रेशीम. १३२०००/प्र. क्र. ४/रेशीम कक्ष, दिनांक १२ एप्रिल २०१० अन्वये विहित करण्यात आले आहेत. या अधिसूचनेतील मराठी भाषेतील सेवाप्रवेश नियमात भाषांतरामुळे झालेल्या विसंगतीच्या अनुषंगाने पुढील दुरुस्त्या करण्यात येत आहेत :—

### शुद्धिपत्र

वर नमूद दिनांक १२ एप्रिल २०१० च्या अधिसूचनेतील मराठी भाषेतील सेवाप्रवेश नियमातील

(१) परिच्छेद ३(ख) (एक)

ज्यांचे वय चाळीस वर्षाहून जास्त नसेल,

परंतु, अगोदरच सेवेत असलेल्या व्यक्तीबाबत वयोमर्यादा पाच वर्षेपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

### या ऐवजी

ज्यांचे वय त्रेचाळीस वर्षाहून जास्त नसेल,

परंतु, अगोदरच सेवेत असलेल्या व्यक्तीबाबत वयोमर्यादा पाच वर्षेपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

असा वाचावा.

(२) परिच्छेद क्र. ३(ख) (तीन)

" वरील उपखंड ख (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कृषीशास्त्र/रेशीम/जीवशास्त्र/प्राणीशास्त्र/वनस्पतीशास्त्र या विषयातील किमान तीन वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव आणि कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय विभागातील किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील किंवा शासनाने अथवा महामंडळाने स्थापन केलेल्या सांविधिक प्राधिकरणातील/महामंडळातील जबाबदारीच्या पदावरील प्रशासकीय कामाचा सात वर्षांचा अनुभव असा एकूण दहा वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव धारण केला असेल किंवा संबद्ध विषयातील दहा वर्षांहून कमी नसेल इतका गुणवत्तापूर्ण संशोधन कार्याचा अनुभव धारण केला असेल "

**या ऐवजी**

" वरील उपखंड ख (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कृषीशास्त्र/रेशीम/जीवशास्त्र/प्राणीशास्त्र/वनस्पतीशास्त्र अथवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी या विषयातील किमान तीन वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव आणि कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय विभागातील किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील किंवा शासनाने अथवा महामंडळाने स्थापन केलेल्या सांविधिक प्राधिकरणातील/महामंडळातील जबाबदारीच्या पदावरील प्रशासकीय कामाचा सात वर्षांचा अनुभव असा एकूण दहा वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव धारण केला असेल किंवा संबद्ध विषयातील दहा वर्षांहून कमी नसेल इतका गुणवत्तापूर्ण संशोधन कार्याचा अनुभव धारण केला असेल "

असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुनील पोरवाल,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.